साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–दिवाकर क्रिष्णा खडसे
वय:–५६ वर्ष, व्यवसाय–रोजमजुरी
राह.अंतरगाव, ता.समुद्रपुर, जि.वर्धा.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. घटना दिनांक २४/१२/२०२२ रोजी सायंकाळी ४.३० ते ५.०० वाचेच्या दरम्यानची आहे. सदर दिवशी मी गावावरून आलो असता संजय सातपुते यांनी मला फोन करून सांगितले की, तुझ्या मुलाचा अपघात झाला आहे. त्यानंतर साहेबलोकांनी मला फोन केले की, सिर्सी खातखेडाच्या मधील घटनास्थळावर या. त्यानंतर मी माझ्या गावच्या पोराच्या गाडीवर बसुन घटनास्थळी गेलो. त्यानंतर मी तेथे जाउन माझ्या मुलाचे प्रेत मालवाहू गाडीमध्ये टाकले त्यावेळी मी बेहोश झालो होतो. एम.एच.४० क्रमांक असलेल्या चारचाकी गाडीने माझ्या मुलाचा अपघात झाल्याचे मला कळाले. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला सदर गाडीचा नंबर आता आठवत नाही. सदरचा अपघात कसा झाला, काय झाला याबाबत मला माहिती नाही. त्यानंतर मी पो.स्टे.ला रिपोर्ट दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.१२** देण्यात आला. आता मला प्रथम खबर दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.१३** देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.पी.एच.रघूते यांच्यामार्फत सुरू.**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मुलाचा अपघात प्रत्यक्ष पाहिला नसल्याने तो कसा झाला त्याबाबत मला सांगता येत नाही. सदर घटनेची मी रिपोर्ट दिली नव्हती पोलिसांनीच रिपोर्ट दिली होती. पोलिसांनी जिथे जिथे सह्या करा असे मला म्हटले तिथे तिथे मी सह्या केल्या. फिर्यादमधील मजकूर काय लिहीला हे मला माहित नाही कारण त्यावेळी माझी मनस्थीती जाग्यावर नव्हती कारण माझ्या मुलाचा अपघात झाला होता.

३. हे म्हणणे खरे आहे की, सिर्सी ते उमरेड हा वर्दळीचा रोड आहे व नेहमी गाड्यांची ये–जा असते. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा कुरियर देण्याचे काम करत

होता त्यामुळे माझ्या मुलाच्या पाठीमागुन कुरियरचा बॉक्स बांधुन राहायचा व त्या दिवशीसुध्दा माझ्या मुलाच्या पाठीवर कुरीयरचा बॉक्स बांधलेला होता.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१७/०६/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड